# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
# जुनी मध्यवर्ती इमारत, तळमजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५११७७/१० ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-अभिलेख धारिका क्र. ४९ /नैमित्तिक रिक्त जागा/१७५०/सन २०१८ दिनांक २६/१०/२०१८.

**वाचावे :-**

१. महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम ७३ सीबी (१) व (१४).

२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७४.

३. या प्राधिकरणाकडील प्रस्ताव दिनांक ३/२/२०१८ .

४. विधी व न्याय विभागाकडील पत्र जा.क्र.१२९/७७८/सिव्हील/कॉन्फिडेन्शल/२०१८/अे ब्रँच, दिनांक २४/९/२०१८.

५. कक्ष अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग, मंत्रालय मुंबई यांच्याकडील पत्र जा.क्र. सनिनि ०२१८/प्र.क्र.१६/१३-सी, दिनांक १५/१०/२०१८.

**प्रस्तावना:-**

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ सीबी (१) मधील तरतुदीनुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाची, पदाधिकाऱ्यांची व संस्थेत नैमित्तिक रिक्त होणारी पदे विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार भरण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपविलेली आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ सीबी (१४) (बी) मधील तरतुदीनुसार प्रत्येक सहकारी संस्थेच्या समितीमध्ये किंवा तिच्या पदाधिकाऱ्यांमध्ये निर्माण झालेल्या कोणत्याही नैमित्तिक रिक्त पदाबाबत असे रिक्त पद निर्माण झाल्यापासून १५ दिवसाच्या आत प्राधिकरणास कळविणे बंधनकारक आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७४ मधील तरतुदीनुसार एखादया संस्थेच्या समिती सदस्याचे निधन झाल्यामुळे, त्याने राजीनामा दिल्यामुळे, त्याला अनर्ह ठरविल्यामुळे अथवा त्याला काढून टाकण्यात आल्यामुळे अथवा त्याच्या पदाची मुदत संपण्यापूर्वी अथवा अन्यथा काम करण्यास तो असमर्थ झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागा हया नैमित्तिक रिक्त जागा या सदरात मोडत असल्याने सदरच्या नैमित्तिक रिक्त जागा अधिनियमातील तरतुदीनुसार भरण्याचे अधिकार प्राधिकरणास प्राप्त आहेत ;

ज्याअर्थी शासनाने वरील संदर्भ क्र. ५ च्या पत्रानुसार संविधानाचे अनुच्छेद २४३ झेडजे (२) मधील तरतुदीच्या पार्श्वभूमीवर तसेच विधी व न्याय विभागाचे अभिप्रायाप्रमाणे महाराष्ट्र सहकारी संस्था, (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (v) अनुसार प्राधिकरणास प्राप्त अधिकारानुसार नैमित्तीक रिक्त जागा भरण्यासंदर्भात प्राधिकरणास पुढील कार्यवाही करणे बाबत सुचीत केलेले आहे;

त्याअर्थी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण सहकारी संस्थांच्या समिती सदस्यांमधील रिक्त झालेल्या नैमित्तिक जागा भरणेबाबत प्राधिकरणास महाराष्ट्र सहकारी संस्था, (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (v) अन्वये असलेल्या अधिकाराचा वापर करुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :: आदेश ::


महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ सीबी व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (v) अन्वये प्राप्त अधिकारानुसार प्राधिकरण ज्या सहकारी संस्थेच्या समितीची मुदत संस्थेच्या निवडणूकीच्या निकालाच्या दिनांकापासून अडीच वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त झालेली आहे, अशा समितीत निर्माण झालेल्या नैमित्तीक रिक्त जागा, ज्या प्रवर्गातील आहेत त्याच प्रवर्गातील पात्र सदस्यांमधून, स्वीकृतीने संस्थेच्या समितीकडून संचालक मंडळ सभेमध्ये निर्णय घेवुन भरण्यास आदेश देत आहे. नैमित्तिक रिक्त जागा भरणेबाबत प्राधिकरण पुढीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करीत आहे.

१. नैमित्तीक रिक्त पदाबाबतची माहिती संबंधित संस्था प्राधिकरणास व जिल्हा/तालुका/वॉर्ड सहकारी निवडणूक अधिकारी यांना पद रिक्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत कळवील.

२. ज्या प्रवर्गातील जागा रिक्त झाली आहे त्याच प्रवर्गातील तसेच पोटनियमात नमुद संबंधीत मतदारसंघ/गटातील संस्थेच्या सभासदांमधील पात्र व्यक्तींची अधिनियम, नियम, संबंधीत संस्थेचे पोटनियम व निवडणूक नियमानुसार संचालक मंडळ असे नैमित्तीक रिक्त झालेल्या पदासाठी स्विकृतीने निवड करेल.
३. अशी नैमित्तीक रिक्त पदे भरण्याकरीता संस्था पोटनियमातील संबंधीत तरतुदीनुसार संचालक मंडळाच्या सभेचे आयोजन करेल.
४. संबंधीत संस्थेचे सचिव/ मुख्य कार्यकारी अधिकारी तत्पुर्वी नैमित्तीक रिक्त जागा भरण्याकरीता इच्छुक पात्र सभासदांकडून अर्ज मागवण्याच्या प्रयोजनार्थ संस्थेच्या नोटीस बोर्डावर व निबंधक कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर नोटीस देवुन सदर नोटीशीत अर्ज सादर करण्याची अंतीम दिनांक नमुद करेल. अर्ज सादर करण्यासाठी किमान ७ ते १५ दिवसांचा अवधी देणे आवश्यक राहील. तसेच अशी नोटीस लावलेबाबतचा पंचनामा करेल.
५. इच्छुक सभासद आपल्या अर्जासह रिक्त पदासाठी पात्र असले बाबत स्वयंघोषणापत्र व यानुसार सदर सभासद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कअ व नियम १९६१ व संस्थेचे मंजूर उपविधीनुसार संचालक होणेस अपात्र नाही असे घोषणापत्र विहित मुदतीत संस्थेचे सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे अर्जासोबत सादर करेल.
६. सदर अर्जाची तसेच संबंधीत माहितीची छाननी करुन संचालक मंडळ सभेचे आयोजन वरील अ.क्र. ४ मध्ये नमुद केलेल्या अंतिम दिनांकापासून १५ दिवसांच्या आत करणेबाबत संस्थेचा सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यवाही करेल.
७. सदर संचालक मंडळ सभा रिक्त पदे भरणेबाबतच्या एकाच विषयावर घेणेत येईल. सदर सभेत अन्य विषयावर चर्चा करता येणार नाही. तसेच मागील सभांमधील इतिवृत कायम करण्याबाबत देखील कार्यवाही करता येणार नाही.
८. संस्थेचा सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी संचालक मंडळ सभेमध्ये झालेला निर्णय व इतिवृत्त सभा झालेपासून सात दिवसाचे आत संबंधित निबंधकाकडे व जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे सादर करेल. सदर सभेमध्ये झालेल्या निर्णयाचा/इतिवृताचा नमुना सोबत जोडलेला आहे. त्याप्रमाणे शब्द रचना करण्यात यावी.
९. अशाप्रकारे स्वीकृतीने/नामनिर्देशनाने भरावयाचे नैमित्तिक रिक्त पदे ही समितीच्या एकुण कालावधीत दोन पेक्षा अधिक भरता येणार नाहीत. प्रथम रिक्त होणाऱ्या दोन जागा/पदे प्रथमत: स्वीकृतीने भरण्यात यावीत व तदनंतर रिक्त होणाऱ्या जागा/पदे निवडणूकीद्वारे भरण्याचा प्रस्ताव प्राधिकरणास सादर करता येईल.
१०. निवडणूक निकालाच्या दिनांकापासुन अडीच वर्षाच्या आत संचालक मंडळात नैमित्तीकपणे रिक्त झालेली जागा निवडणूकीद्वारे भरता येईल.

नैमित्तीक रिक्त जागा भरण्याची उपरोक्त कार्यपध्दती संबंधीत जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी आपल्या अधिनस्त सहकारी संस्थांच्या निदर्शनास आणून विहीत कार्यपध्दतीचे काटेकोर पालन करण्याची दक्षता घ्यावी.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आदेशाने.**




२८।१०।१८

(यशवंत गिरी)
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत,

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालुका सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

## <u>संचालक मंडळ सभेचे इतिवृत (मसुदा)</u>

**विषय :- संचालक मंडळातील नैमित्तीक रिक्त पदे स्वीकृतीने भरण्याबाबत.**

**ठराव** :- संचालक मंडळातील रिक्त झालेल्या एक/दोन संचालक पदाकरीता दिनांक ---------- रोजी सर्व सभासदांकडून अर्ज मागविणे बाबत नोटीस प्रसिध्द करण्यात आली. दिनांक ------------ ते दिनांक ----------- या कालावधीमध्ये -------- अर्ज प्राप्त झाले. सदर अर्जाची कलम ७३ सीए प्रमाणे व उपविधीतील तरतुदीप्रमाणे पात्रता/अपात्रता तपासण्यात आली. सदर अर्जापैकी आज झालेल्या संचालक मंडळ सभेपुढे खालील पात्र अर्जदारांचे अर्ज सादर करण्यात आले.

१.
२.
३.
४.
५.

उपरोक्त अर्जदारांपैकी खालील इच्छुक सभासदांची निवड सर्वांनुमते/बहुमताने **स्वीकृत** संचालक सदस्य म्हणून करण्यात आलेली आहे.

१.
२.

सदर सभासद हे/हा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, व त्याखालील नियम १९६१ व उपविधीनुसार पात्र असल्याचे घोषणापत्र घेण्यात आले असून संस्थेने त्याच्या पात्रतेची खात्री करुन तो संचालक मंडळ सदस्य होण्यास पात्र असल्याचे आढळून आलेले आहे. सदरचे पद ज्या प्रवर्गातील आहे त्याच प्रवर्गातील सभासदांमधुन भरण्यात आले आहे.

सचिव                    चेअरमन